FYBA
Marathi (Old Syllabus)
2/3/2020

X-13DAI(o) L-II

[वेळ : तीन तास] [गुण : १००]

3 इकरण

Please check whether you have got the right question paper.

सूचना : 1. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.
2. उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

प्र. १ अ) बालपण, शिक्षणातील संस्कार व अपयशावर केलेली मात याबद्दलचे अनुभव 'दुसऱ्या वेळी पास झालो' या महात्मा गांधी यांच्या लेखातून कसे व्यक्त होतात ते सविस्तर लिहा. २०

किंवा

ब) 'पन्नासपैकी शून्य मार्क' आणि 'कोठे होतो कोठे आलो' या लेखातून अपयशावर मात करून विजय मिळवता येतो हे अनुभव कसे व्यक्त होतात, ते साधार लिहा. २०

प्र. २ अ) चंद्रशेखर धर्माधिकारी आणि वाय. सी. पवार यांनी स्वतःला कसे घडवले ते 'नापास मुलांची गोष्ट' मधील लेखांच्या आधारे स्पष्ट करा. २०

किंवा

ब) यशवंतराव गडाख यांनी स्वतःचे व्यक्तिमत्व कसे घडवले ते 'प्रारंभ' लेखाच्या आधारे सविस्तर लिहा. २०

प्र. ३) पुढीलपैकी कोणत्याही दोन टीपा लिहा. १०

अ) 'शंभरपैकी शून्य मार्क' लेखातील बालपणीच्या आठवणी.

ब) 'सरगम' लेखातील सी. रामचंद्र यांच्या वडिलांबद्दलच्या आठवणी.

क) 'शब्दाचे मोल' लेखातील लेखकाचे वाचनवेड.

ड) 'जडणघडण' लेखातील 'शिवल्या' चा अनुभव.

प्र. ४) अ) मुंबईतील कारखान्याकरिता योग्य अशा जागेच्या निवडीसंबंधी चिटणिसाने १०



P.T.O.

X49DAF (a)

कंपनीच्या संचालक मंडळास सादर करावयाचे अहवालात्मक इतिवृत्त तयार करा.

किंवा

आ) 'विद्या प्रसारक मंडळ, ठाणे' या संस्थेने आपला पंचाहत्तरावा (७५) वर्धापन दिन कसा साजरा करावा यासंबंधी विचार विनिमय करण्यासाठी घेतलेल्या सभेचे इतिवृत्त तयार करा. १०

प्र. ५) अ) शहरात नव्याने सुरु होणाऱ्या मराठी दैनिकाची वर्तमानपत्रासाठी जाहिरात तयार करा. १०

प्र. ६) पुढील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. १०

भाषा ही समाजजीवनाला अपरिहार्य आहे, याबद्दल वाद नाही. किंबहुना, एकच भाषा वापरून एकत्र व्यवहार करणारे लोक म्हणजेच समाज, हे लक्षात घेतले म्हणजे समाज या शब्दाच्या ज्या इतर अनेक व्याख्या त्यांच्या वेगवेगळ्या वैशिष्टयांच्या अनुरोधाने आपण करतो त्या सर्वांच्या मुळाशी एकभाषिकत्व हे महत्वाचे तत्व आहे, हे आपल्याला दिसून येईल. वस्तुतः कोणत्याही कारणाने एकत्र येणारे लोक त्या कारणापुरते एका समाजाचे घटक आहेत असे मानले पाहिजे. पण अशा रितीने एकत्र येऊन व्यवहार करणे हेसुद्धा या सर्व लोकांची भाषा एकच असल्याशिवाय, किंवा सर्वांना समजणारी अशी कोणती तरी भाषा प्रत्येकाला आल्याशिवाय, किंवा (काही अपवादात्मक प्रसंगी) दुभाष्याची मदत घेतल्याशिवाय शक्य नाही. नैमित्तिक कारणासाठी थोडावेळ एकत्र येणाऱ्यांची जर ही गत, तर ज्यांचे दैनंदिन जीवन परस्परावलंबी आहे आणि बहुतांशी एकमेकांच्या सहवासात व्यतीत होते, त्यांची गोष्ट तर बोलायलाच नको.

समाजात राहून व्यक्तीला सुखासमाधानाने जगायचे असते, आपल्या आकांक्षा सफल करून घ्यायच्या असतात, इतरांशी सहकार्य करून स्वार्थ आणि परार्थ साधायचा असतो. ही सामाजिक चौकट कधी कधी व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड येत असली तरीही व्यक्तिविकासाला आणि व्यक्तीचे अस्तित्व टिकवायलाही ती आवश्यक आहे. भाषा हा व्यक्तिव्यक्तींतला आणि व्यक्ती आणि समाज यांच्यातला दुवा आहे, स्वतःचे व्यक्तित्व इतरांच्या नजरेला आणून दयायचे माणसाचे पहिल्या दर्जाचे साधन आहे. हे साहित्यात जितके खरे आहे तितकेच व्यवहारातही खरे आहे; म्हणूनच व्यक्तिदर्शन आणि व्यक्तिविकास यांचे हे साधन सर्वांना आधी स्वाधीन करून घ्यावे लागते. ते ज्याला स्वाधीन करून घेता येते तो समाजाचा कर्तृत्ववान घटक बनू शकतो. या कारणामुळेच जन्मांधालाही जी अडचण समाजात वावरताना येत नाही ती जन्मबधिर म्हणजे मुक्या माणसाला येते. दृष्टी शाबूत असलेल्या माणसाला साकार इंद्रियगोचर सृष्टीचा प्रत्यय येऊ शकतो हे खरे असले, तरी दृष्टी हे ग्रहणसाधन आहे, विनिमयसाधन नाही. निदान परंपरा तरी तशी आहे. ध्वनिग्रहण करू शकणारा आणि त्याचे व्यवहारसुलभ अनुकरण करू शकणारा माणूस इतर माणसांशी बोलू शकतो आणि त्यामुळेच समाजाचा प्रभावशाली घटक बनू शकतो.

प्र. १) भाषा आणि समाज यांचे नाते कसे आहे?

२) व्यक्तीच्या दृष्टीने भाषेचे महत्व काय आहे?



P.T.O.

३ ) कोणता माणूस समाजाचा प्रभावशाली घटक कसा असतो?

४ ) कोणती सामाजिक चौकट व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड येते?

५ ) समाजाचा प्रभावशाली घटक कोण बनू शकतो?

किंवा

आ ) पुढील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

ह्या माझ्या पाऊलवाटा अजून जगाला अज्ञात आहेत. त्यांचे नकाशे अजून कोणीही काढलेले नाहीत किंवा शालेय भूगोलाने आपले घारे डोळे अजून या वाटांवर वटारलेले नाहीत. त्यांचे जीवन अजूनही खाजगी आहे. आणि म्हणूनच माझे मन या पाऊलवाटांशी विशेष सलगी करते. त्यांच्या आठवणी मनामध्ये रेंगाळत रहातात ह्या पाऊलवाटा सोडून मी मुख्य सडकेला लागलो की माझ्या वयात एकदम फार मोठे अंतर पडते. सडकेने चालणारा मनुष्य अकाली वृद्ध होतो. पाऊलवाटेला असताना आपले म्हातारपण डोंगराच्या आड दडलेले असते; ते हमरस्त्यावर आपल्याला एकदम सामोरे येते. निरनिराळी रूपे घेऊन ते आपल्याला भेडसावू लागते. कधी अडगळीच्या सामानाने भरलेला एखादा खटारा चडफडत धडपडत आपल्या जवळून पुढे जातो; कधी कणा वाकलेला एखादा ओझ्याचा ट्रक कुथत कण्हत स्वतःचे शरीर पुढे ढकलतो; कधी खुद्द सडकेच्या बरगडयाच उघडया पडलेल्या दिसतात. आपले म्हातारपणच निरनिराळ्या रुपांनी आपल्याला भेडसावू लागते. अशावेळी आपले हातपाय आपण आत आत ओढून घेतो आणि स्वार्थाशिवाय दुसरा विचार मूर्खपणाचा वाटतो. भविष्याची भीती वाटते. आसपासच्या निसर्गाचे रुपये-आणे-पैमध्ये रुपांतर होऊ लागते. पोसलेले भात पाहिले की यंदा दर काय फुटणार हाच विचार मनामध्ये येतो. मोहरलेली आंब्याची कलमे दिसली तर मुंबईच्या बाजारातील तेजी-मंदी आठवू लागते. आपल्या डोक्यावर आकाश आहे ही गोष्टच मी विसरुन जातो. आणि ते सहाजिकच आहे; कारण आकाशाला किंमत नसते. हमरस्त्याने चालताना कधी काळी व्यवहाराच्या सोयीसाठी अर्धवट सोडलेली भांडणे मी पुन्हा एकदा मनासारखी भांडून घेतो; इतरांना फसवण्याचे निरनिराळे व्यूह रचतो. असल्या धोपट मार्गाने जाताना माझे मन अनेक वाकडी वळणे घेत असते. पण पुन्हा एकदा मी माझ्या पाऊलवाटेला वळलो की हे सारे मागे रहाते. मग त्या पुर्वीच्या पापी विचारांची जवाबदारी माझ्यावर आहे असे मी बिलकूल मानत नाही. कारण हे एक सत्य मला पुनःपुन्हा सांगितले पाहिजे; माणसाचे विचार त्याच्या पायाखालील रस्त्यावर अवलंबून असतात.

प्र १ ) लेखक पाऊलवाटांना खाजगी का म्हणतो?

२ ) पाऊलवाटेने आणि सडकेने चालताना मनात येणाऱ्या विचारांत काय फरक असतो?

३ ) माणसाचे विचार त्याच्या पायाखालील रस्त्यावर अवलंबून असतात, म्हणजे काय?

४ ) माणसाचे विचार त्याच्या कशावर अवलंबून असतात?

५ ) उताऱ्याला समर्पक शीर्षक सुचवा.



P.T.O.

प्र. ७ पुढीलपैकी कोणत्याही एका उताऱ्याचे सारांशलेखन करा. १०

शिल्पकला ही अत्यंत प्राचीन अशी कला आहे. पूर्वी मूर्तिकार अशी संज्ञा अधिक प्रमाणात वापरली जायची. देवदेवतांच्या, राजेराजवाडयांच्या, मोठया आदरणीय व्यक्तीच्या मूर्ती तयार करण्याचे काम हे मूर्तिकार करीत. त्यासाठी ते पाषाण, संगमरवर, लाकूड, तांबे, पितळ, पंचधातू, सोने, चांदी इत्यादींचा वापर करीत. आजही ही प्रथा कायम आहे. आणि या मूर्तीमधून संवाद साधण्याची किंवा पुनःप्रत्ययाचा आनंद देण्याचीच प्रक्रिया होते. अलीकडच्या काळात शिल्पकार हा शब्द अधिक प्रमाणात वापरला जातो. परंतू त्या काळात कोरीव लेणी तयार करणारे कलाकार हे तसे मूर्तिकारच होते. अगदी रामायण–महाभारताच्या काळातही दिवंगत वा हयात असणाऱ्या मंडळीच्या प्रतिमा–मूर्ती–शिल्प बनवण्याची प्रथा होती असे दिसते. राजधान्यांच्या मोक्याच्या ठिकाणी, राजप्रासादांमध्ये निरनिराळ्या प्रकारचे पुतळे उभे करून, त्या जागा सुशोभित करणे वा त्या त्या दिवंगत व्यक्तींचे स्मरण, त्यांच्या बद्दलच्या भावनांना उजाळा देऊन त्यांची स्मृती कायम जागृत ठेवण्यासाठीही ही शिल्पकृती वापरली जात असे. आजही राजधानी दिल्ली सारख्या शहरात, मुंबई सारख्या व्यापारी शहरात, कलकत्ता, मद्रास सारख्या महानगरांमध्ये अनेक मान्यवरांचे पुतळे–शिल्पे उभारलेली दिसतात. अशा पुतळ्यांच्या उभारणीमागे त्या व्यक्तीच्या जीवनकार्याची सतत आठवण होत रहावी हाच हेतू असतो.

किंवा

वृक्ष आपले गुरू आहेत. निःस्वार्थीपणा, परोपकार, त्याग हे गुण वृक्षांपासून शिकावेत. ते आपल्या आरोग्याचीही दखल घेतात. ते आपल्या उदरभरणाची काळजी वाहतात. सर्दीपडशापासून ते कॅन्सरसारख्या रोगांवर वनस्पतींपासून औषधे मिळतात. वृक्षांची मुळे जमिनीत ओलावा धरून ठेवतात, तसेच वृक्षांमुळे जमिनीची धूप थांबते, पाऊस पडतो, थंडावा मिळतो. या वृक्षवल्लींनी आपली किती काळजी घ्यावी, याला काही सीमाच नाही. त्या आपल्या उदरभरणाची काळजी वाहतात. शिवाय नवनवीन प्रकारच्या वस्त्रनिर्मितीकरिता लागणारा धागा निर्माण करण्याच्या प्रक्रियेसाठी, वृक्षवल्लींचीच आवश्यकता असते. म्हणजे आपल्याला रंगीबेरंगी वस्त्रांनी नटवण्यात यांचाच वाटा. आपले घरकुल उभे करण्यात आणि ते फर्निचरने सुशोभित करण्यातही यांचाच वाटा. केसात माळयला फुलेदेखील यांचीच देणगी. एवढेच कशाला, पाण्यात बुडणाऱ्या माणसाला काठीचा, फळीचा आधार तोही यांचाच. तात्पर्य काय? माणूस हा वृक्षाच्या आधाराशिवाय जगूच शकत नाही आणि असा हा आधारच तोडून टाकायचा? मग आपण जगायचे तरी कसे? शरीरातून हृदयच काढून टाकल्यासारखे नाही का ते? छे, छे! असे करता कामा नये. आपल्या उपकारकर्त्यावर असा घाला घालणे योग्य नाही. हा घाला घालण्यासाठी लागणारी कुऱ्हाडदेखील लाकडाचीच! म्हणजे वृक्ष हवाच!

प्र. ८ पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. १०

१) वृक्ष माझे सांगाती

२) बलशाली महिला, बलवान राष्ट्र

३) पूरग्रस्तांचे आत्मवृत्त

४) वाचनालयः एक ज्ञानमंदिर

---



9